आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१६ सप्टेंबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया, खासगी उद्योजकतेची कामगिरी आणि तंत्रज्ञानाचा वाढता आवाका यामुळे जागतिक पातळीवरच्या आर्थिक प्रगतीत भारत अग्रणी राहील, असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचं निरीक्षण

- कर क्षेत्रातील व्यावसायिकांनी राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावं, असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आवाहन

- लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ आजपासून तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर

**आणि**

- भारत विरुद्ध अफगाणिस्तान टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना उद्या दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर रंगणार

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया, खासगी उद्योजकतेची कामगिरी आणि तंत्रज्ञानाचा वाढता आवाका यामुळे जागतिक पातळीवरच्या आर्थिक प्रगतीत भारत अग्रणी राहील असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटलं आहे. आयएमएफचे उप व्यवस्थापकीय संचालक निगेल क्लार्क यांनी पाच दिवस भारत दौरा केल्यानंतर ही प्रतिक्रीया दिली. या दौऱ्यात त्यांनी दिल्ली, मुंबई, आणि चेन्नई इथं विविध बैठका घेतल्या. भारतातल्या नवोन्मेषी उद्योजकतेचं, आणि तंत्रज्ञानाधारित उत्पादनांच्या दर्जाचं त्यांनी कौतुक केलं. या दौऱ्यात निगेल क्लार्क यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी, आणि इतर मान्यवरांना भेटून चर्चा केली.

**<><><><><>**

कर धोरणावरील स्वतंत्र संशोधनांवर सार्वजनिक चर्चा केली जावी, तसंच कर क्षेत्रातील व्यावसायिकांनी क्षेत्रीय हितसंबंधांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावं, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केलं.

बंगळुरू इथं 'इंटरनॅशनल टॅक्स रिसर्च अँड ॲनालिसिस फाउंडेशन'तर्फे 'न्यू एज टॅक्सेशन' या विषयावर आयोजित ८ व्या आंतरराष्ट्रीय कर परिषदेत त्या बोलत होत्या.

<><><><><>

लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ आजपासून तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात रशियन लष्कराचे कमांडर-इन-चीफ कर्नल जनरल आंद्रेई निकोलाये-विच मोर्दवि-चेव यांच्याशी ते विविध मुद्द्यांवर चर्चा करतील. जनरल सेठ यांना रशियात औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात येणार आहे. जनरल सेठ मॉस्को इथल्या सैनिकांच्या स्मारकाला भेट देणार आहेत.

संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, जनरल सेठ मॉस्को इथल्या नॅशनल डिफेन्स कंट्रोल सेंटरलाही भेट देणार आहेत. यावेळी ते रशियन संरक्षण मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. भारत आणि रशिया मधील दीर्घकालीन संरक्षण भागीदारी आणि लष्करी-लष्करी सहकार्य अधिक दृढ करणं हा या दौऱ्याचा प्रमुख उद्देश असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत यशोभूमी इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या पाचव्या सेमिकॉन इंडिया २०२६ परिषदेचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेच्या माध्यमातून नवोन्मेषाला चालना देणं, सहकार्य वाढवणं, उत्पादन क्षमता मजबूत करणं, गुंतवणूकदारांना आकर्षित करणं तसंच भविष्यासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. या परिषदेत ६०० हून अधिक प्रदर्शक, ३०० आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि ४० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील भागीदारी, गुंतवणूक, तंत्रज्ञान सहकार्याच्या संधी शोधण्याबरोबरच देशाची जागतिक पातळीवर सेमीकंडक्टर भागीदार म्हणूनची भूमिका विश्वसनीय आणि अधिक मजबूत करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आंदोलनात पोलिसांनी केलेल्या बळाच्या अ-वाजवी वापराची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या

उच्चस्तरीय समितीची पुनर्रचना करायला सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. या समितीवरचे आरोप हे केवळ तर्क आणि पूर्वग्रहांवर आधारित असल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठाने स्पष्ट केलं. न्यायालयात कोणत्याही एका पक्षाची बाजू मांडण्यासाठी ही चौकशी समिती स्थापन केलेली नसून निःपक्षपातीपणे, पारदर्शक पद्धतीने आणि तटस्थ दृष्टिकोनातून न्यायालयाला मदत करण्यासाठी स्थापन करण्यात आल्याचंही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री शिवराज चौहान यांनी आज बिहारमधल्या पूरग्रस्त भागाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी वैशाली जिल्ह्यातल्या पूरग्रस्त क्षेत्राची पाहणी करून मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांच्याबरोबर मुख्यमंत्री सम्राट चौधरी देखील होते. यानंतर चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेणार आहेत. या बैठकीत बचाव कार्य आणि बाधित शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा आढावा घेतला जाईल अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागाने जारी केलेल्या निवेदनानुसार, नेपाळ आणि बिहारमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे बिहारमध्ये १५ जिल्ह्यांतले सुमारे ४९ लाख ७४ हजार लोक बाधित झाले आहेत. बाधित जिल्ह्यांमध्ये पाटणा, भोजपूर, सारण, वैशाली, भागलपूर, बेगुसराय, बक्सर, समस्तीपूर, मुंगेर, कटिहार, लखीसराय, खगरिया, पूर्णिया, मधेपुरा आणि अररिया यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आज जागतिक ओझोन दिन. पृथ्वीभोवती असलेला ओझोनचा थर हा हानिकारक अतिनील किरणांपासून संरक्षण करणारं कवच आहे. ओझोनच्या थराचं संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. एसी २४ अंश सेल्सिअसवर ठेवणे तसंच कार्यक्षम आणि योग्य उपकरणांचा वापर करणे अशासारख्या सोप्या उपायांमुळे कार्बन उत्सर्जन कमी होतं. ओझोनच्या थराचं संरक्षण हे मानवी आरोग्य,

जैवविविधता आणि हवामानाचं स्थैर्य निश्चित राखतं, असं सिंह आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

<><><><><>

भारत आणि अफगाणिस्तान क्रिकेट संघांमधे टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना उद्या नवी दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयममधे होणार आहे काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं अफगाणिस्तानचा सात गडी राखून पराभव केला, आणि तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. १६० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने १४ षटकं आणि ५ चेंडूत ३ बाद १६३ धावा करत सहज विजय मिळवला. नितीश कुमार रेड्डीला सामनावीर घोषित करण्यात आलं.

<><><><><>

टोकियो इथं होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी भारतीय महिला संघ जपानमध्ये पोहोचला आहे.भारतीय महिला संघ या स्पर्धेत उत्तम कामगिरी करण्यासाठी उत्सुक असल्याचं संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी सांगितलं. आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेट स्पर्धेत यंदा केवळ आठ संघ सहभागी होत असून, स्पर्धेला थेट उपांत्यपूर्व सामन्यांपासून सुरुवात होणार आहे.

भारतीय संघाची पहिली लढत यजमान जपानशी येत्या शुक्रवारी होणार आहे. हांगझोऊ इथं २०२३ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला क्रिकेटचं सुवर्णपदक भारतानं पटकावलं होतं.

<><><><><>

श्रोतेहो, आशियाई क्रीडास्पर्धांवर आधारित विशेष कार्यक्रमाचं प्रसारण आजपासून येत्या शुक्रवारपर्यंत आकाशवाणीवरुन रात्री ८ ते साडे ८ दरम्यान केलं जाणार आहे. त्यामुळं हे तीन दिवस आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन राष्ट्रीय बातमीपत्र साडे ८ वाजता प्रसारित होईल.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आज आणि उद्या भूतानच्या दौऱ्यावर आहेत. भूतानचे परराष्ट्र आणि व्यापार मंत्री ल्योनपो डी. एन. धुंग्येल यांच्या निमंत्रणावरून जयशंकर भूतानचा दौरा करत आहेत. भूतानबरोबर द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी चर्चा करण्याच्या

उद्देशाने हा दौरा होत आहे. या दौऱ्यात ते भूतानचे राजे तसंच भूतानचे प्रधानमंत्री यांचीही भेट घेतील, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

भारत आणि अमेरिकेच्या लष्करी तुकड्यांचा समावेश असलेला युद्ध अभ्यास या संयुक्त लष्करी सरावाला कालपासून सुरुवात झाली. या सरावाचा उद्देश दोन्ही देशांच्या लष्करांची कार्यक्षमता वृद्धिंगत करणे, उदयोन्मुख आव्हानांचा सामना करणे आणि द्विपक्षीय संरक्षण भागीदारी अधिक दृढ करणे, असा आहे. सरावाच्या २२ व्या आवृत्तीचं उद्घाटन उत्तराखंडमधे औली फॉरेन ट्रेनिंग नोड इथं झालं. हा सराव एकाच वेळी औली आणि राजस्थानमधील महाजन फील्ड फायरिंग रेंज इथं होणार आहे.

<><><><><>

गणेशोत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. दीड दिवसांच्या गणपतीचं विसर्जन काल झालं. मुंबईत सार्वजनिक गणोशोत्सव मंडळांच्या ३०१ मूर्ती, तर ६१ हजार २४७ घरगुती गणपतींना काल निरोप देण्यात आला. हरतालिका मूर्तींचं देखील काल विसर्जन करण्यात आलं.

सार्वजनिक गणेशोत्सवांमधे आजही विविध कार्यक्रम होत आहेत. भाजपा अध्यक्ष नितीन नवीन यांनी आज मुंबईत लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या सोबत होते.

<><><><><>

नेपाळच्या मुगू जिल्ह्यात आज भूकंपाचे दोन धक्के जाणवले. तीन तासांच्या अंतराने जाणवलेल्या या धक्क्यांची तीव्रता रिक्टर मापकावर साडेचार आणि चार पूर्णांक २ दशांश एवढी नोंदली गेली.

//<><><><><>//